दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -२९९ गुरूवार,दि.०३ जुलै २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-5th Issue-299 Thursday, Dt.03 July 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## माझी आई सत्यभामाबाई बांगर आणि मलाही मारण्याचा प्रयत्न वाल्मीक कराडने केला होता



विजयसिंह बांगर यांच्या नव्या खुलाशाने बीड जिल्ह्यात पुन्हा नवी खळबळ

बीड /प्रतिनिधी

मसाजोगचे सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणातील मास्टर माईंड अशा आरोपाखाली संशयित म्हणून ज्यांना पोलिसांनी अटक केली आहे त्याच वाल्मिक कराडने माझी आई सत्यभामाबाई बांगर यांना आणि मलाही मारण्याचा प्रयत्न केला होता. इतकेच नव्हे तर महादेव मुंडे यांचा खून देखील वाल्मीक कराड यांनीच केला. त्यांनी अनेक लोक मारले आहेत. असा खळबळजनक दावा आणि आरोप एकेकाळी वाल्मीक कराड यांचे नेतृत्व स्वीकारून त्यांच्यासोबत राजकीय प्रवास करणारे आजचे विरोधक विजयसिंह बांगर यांनी केल्याने पुन्हा एकदा नव्याने खळबळ उडाली आहे.पुढे विजयसिंह बांगर यांनी केलेल्या आरोपात म्हटले आहे की, बीड, परळीत वाल्मिक कराडने अनेक लोक मारले. वाल्मिक कराडने मारलेल्या लोकांपैकी एक महादेव मुंडे आहेत. असा मोठा गौप्यस्फोट विजयसिंह बांगर यांनी केला. विजयसिंह बांगर हे वाल्मिक कराडचे जुने सहकारी आहेत. त्यांनी यासंदर्भात पुरावा म्हणून काही जुन्या कॉल रेकॉर्डिंगही ऐकवल्या. त्यांनी केलेल्या गंभीर आरोपांमुळे पुन्हा एकदा वाल्मिक कराडचे काळे कारनामे समोर आले आहेत. ते पुढे असे म्हणाले की,या प्रकरणी मी महादेव मुंडे यांच्या कुटुंबाची भेट घेणार आहे. त्यांच्यावर काही दबाव असेल तर मी स्वत: त्यांच्या बाजूने वाल्मिक कराडच्या विरोधात फिर्याद देण्यासाठी तयार आहे. मी याबद्दल मुंडे यांच्या कुटुंबाशी चर्चा करेल. संपूर्ण परळीला माहिती आहे की, वाल्मिक कराडने किती लोकांना मारले, मी येणा-या काळात याबद्दल नावासह अधिक खुलासे करेल, असेही बांगर म्हणाले. बांगर यांच्या या नव्या आरोपामुळे वाल्मीक कराड यांची अडचण वाढणार का ? हे लवकरच स्पष्ट होईल.

## परळी वैद्यनाथ येथे कृषी भवन उभारण्याच्या १ कोटी ६७ लाख रुपयांच्या निधी खर्चास प्रशासकीय मान्यता

### धनंजय मुंडे यांची आणखी एक शब्दपूर्ती

मुंबई ।प्रतिनिधी

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी मागणी केल्याप्रमाणे सहकार व पणन विभागाने मराठवाड्यात नामांकित असलेल्या परळी वैद्यनाथ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कृषी भवन उभारण्याच्या कामासाठी १ कोटी, ६७ लाख ७० हजार रुपयांच्या निधी खर्चास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेतून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. धनंजय मुंडे यांनी यानिमित्ताने परळी मतदारसंघात दिलेल्या आणखी एका शब्दपूर्तीस दुजोरा प्राप्त झाला आहे. परळी वैद्यनाथ कृषी उत्पन्न बाजार समिती ही मराठवाड्यात वैभव संपन्न बाजार समिती म्हणून ओळखली जाते. शिवाय ज्योतिर्लिंग स्थळ असल्याने येथील कृषी उत्पन्न बाजारपेठ मोठी आहे. त्यामुळे येथे विविध कामांसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना निवारा व सर्व सोयी एकत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने येथे शेतकरी भवन उभारण्याच्या



कामासाठी निधी मंजूर करण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यानुसार सहकार विभागाने आज प्रशासकीय मान्यता दिली आहे.

याबाबत बाजार समितीचे सभापती सूर्यभान मुंडे, उपसभापती श्री जाधव, सचिव बलवीर रामदासी यांनीही आ. धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला. तसेच त्यांनी श्री मुंडे यांच्या सह सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## बीड जिल्ह्यात वाळू तस्करांना पुन्हा दणका

### पोलिसांनी २७ लाखांचा मुद्देमाल केला जप्त



बीड ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा परिसरात दि.२ जुलै रोजी पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी पुन्हा वाळू तस्करांवर कारवाई केली आहे.गोदापात्रात केलेल्या या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी चकलांबा-पोलीस ठाण्यात १) विकास संपत केसभात रा. गायकवाड जळगाव २) मोहम्मद अहमद शेख रा. सुकली रा. शेवगांव जिल्हा अहिल्यानगर अश्या २ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी मागच्या काही दिवसांत वाळू तस्करांवर मोठ्या कारवाया केल्या आहेत.बुधवारी (दि.२) महारटाकळी येथे नदी पात्रात एक ट्रॅक्टर चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना करत कारवायाचे आदेश दिले.त्यानुसार पोलिसांनी छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे टॅक्टर व एक जेसीबी आढळून आले.त्यानुसार दोन्ही वाहने ठाण्यात आणण्यात आली असून या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील पोह/१५३३ अमोल अंकुश येळे पोशी / २००४ कैलास विठ्ठल खटाने पोशी/२३१ प्रशांत कल्याण घोंगडे आदींनी केली आहे.

## सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग घेण्याचे कृषी विभागाचे आवाहन

### शेतक-यांना ३१ जुलैपर्यंत योजनेत सहभागी होता येणार

बीड ।प्रतिनिधी

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे पिकाच्या होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या दृष्टिकोनातून जिल्ह्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम विमा योजनेत भाग घेता येणारी पिके खरीप ज्वारी, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, कापूस व कांदा या अधिसूचित पिकांसाठी, अधिसूचित क्षेत्रातील शेतक-यांना ३१ जुलैपर्यंत सहभागी होता येईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी एस.एम.साळवे यांनी कळवले आहे.

पीक विमा योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाईबाबतच्या माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाईन १४४४७ वर संपर्क साधावा. बीड जिल्ह्यासाठी आयसीआयसीआय लोंबार्ड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, स्थानिक सहायक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

ज्वारी पिकासाठी ३३ हजार रूपये प्रति हेक्टरी विमा संरक्षित रकमेस रूपये ६६० विमा हप्ता शेतकऱ्याने भरावयाचा आहे. याप्रमाणेच बाजरी पिकास प्रति हेक्टरी ३० हजार रूपयांच्या विमा संरक्षित रकमेस रूपये ६०० हप्ता, प्रत्येकी प्रति हेक्टरी भूईमुगास ४५ हजार रूपये विमा संरक्षित रकमेस ९०० रूपये, सोयाबीन ५८ हजार विमा संरक्षित रकमेस एक हजार १६० रूपये, मूग २५ हजार विमा संरक्षित रकमेस ५००, उडीद २५ हजार विमा संरक्षित रकमेस ५००, तूर ४५ हजार विमा संरक्षित रकमेस ९००, कापूस ६० हजार विमा संरक्षित रकमेस एक हजार ८००, मका ३६ हजार विमा संरक्षित रकमेस ७२० आणि कांदा ६८ हजार विमा संरक्षित रकमेस तीन हजार ४०० रूपये शेतकऱ्याने विमा हप्ता रक्कम भरावयाची आहे.

या योजनेत भाग घेण्यासाठी शेतकऱ्याचा अग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक आणि ई पीक पाहणी बंधनकारक आहे. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे. ई-पीक पाहणी आणि विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल, भरलेला विमा हप्ता जप्त केला जाईल.

विमा अर्ज भरण्यासाठी प्रति शेतकरी सीएससी विभागास ४० रूपये मानधन केंद्र शासनाने निर्धारित करून दिलेले आहे. ते संबंधित विमा कंपनीमार्फत सीएससी विभागास दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांचा विमा हप्त्या व्यतिरिक्त इतर शुल्क सीएससी चालक यांना देऊ नये. एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्ष काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिला जाणार नाही.

## संत सेवालाल महाराज यांच्या मंदिराचे काम प्राधान्याने पूर्ण करा - मंत्री संजय राठोड



मुंबई /प्रतिनिधी

श्री क्षेत्र पोहरादेवी येथे उभारण्यात येत असलेल्या संत सेवालाल महाराज यांच्या मंदिराचे काम प्राधान्याने पूर्ण करावे. तसेच येथील म्युझियमचे लोकार्पण झाले असून यासंदर्भात त्यांना पुढील नियोजन करण्याचे निर्देश मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या संदर्भातील बैठकीत दिले.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, वाशिमचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम, वित्त व नियोजन तसेच ग्रामविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## मोटार सायकल चोरास अटक, चोरलेल्या सहा मोटार सायकल जप्

### बीडच्या स्थानिक गुन्हे शाखेची दबंग कामगिरी

बीड ।प्रतिनिधी

बीडमध्ये मोटार सायकल चोरणाऱ्या ईसमांची माहीती काढुन कारवाई करण्याची सुचना पोलीस अधीक्षक बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पुथकाला दिल्या होत्या. त्या अनुषगाने स्थानिक गुन्हे शाखेने दुचाकी चोरी करणाऱ्या ईसमाची माहीती काढण्यासाठी प्रयत्ना करीत असताना रेकॉर्डवरील आरोपी नामे जिवन रामदास गाडे, वय २४ वर्ष, रा बार्शी नाका,बीड यास चोरीची दुचाकीसह पोलीसानी परळी रोड येथे सापळा लावुन पकडले. या कारवाईने मोटरसायकल चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे.

आरोपी नामे जिवन रामदास गाडे यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने ईतरही बीड शहरातील व पुण्यामधील मोटार सायकली चोरल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीकडुन एकुण ६ मोटार



सायकली जप् करण्यात येवुन ३,५०,०००/- (तीन लाख पन्नास हजार रुपयाचा) मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीस शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे मोटार सायकलच्या गुन्हयात अटक करण्यात आली आहे. आरोपी नामे जिवन रामदास गाडे याचे कडुन खालील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. सदरील गुन्हे पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.न ३२१/२०२५ कलम ३०३(२) बी.एन.एस, २)पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.न १०३/२०२३ कलम ३७९ भा.दं.विधान, ३) पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.न १९९/२०२३ कलम ३७९ भा.दं.विधान, ४ )पोलीस ठाणे चदननगर, पुणे शहर गु.र.न २५५/२०२४ कलम ३७९ भा.द.विधान,५) पोलीस ठाणे भोसरी गु.र.न १०३७/२०२३ कलम ३७९ भा.द.विधान या अनुषंगाने पाच मोटार सायकलचे गुन्हे आरोपी नामे जिवन रामदास गाडे याने केल्याचे कबुली दिली आहे. तसेच ईतर एक मोटार सायकल बाबत कोणताही अभिलेख मिळुन आला नाही. त्या बाबत पोलीस तपास करीत आहे. सदरचा जिवन रामदास गाडे हा यापुर्वी वडवणी पोलीस ठाणे यानी मोटार सायकल चोरीच्या गुन्हयात अटक केली होती. सदरील कारवाई श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री सचिन पाडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीड , श्री शिवाजी बटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड याचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे, पोलीस हवालदार विकास राठोड, राहुल शिंदे, मनोज परजणे, आशपाक सय्यद, सुनील राठोड यांनी केली आहे.

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ०७ जुलैला

बीड ।प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, ७ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

## अंबड बस आगाराच्या चालकांच्या उर्मट,मुजोर पणाला प्रवासी वैतागले

### अंबड बस आगारातील कर्मचाऱ्यांना सौजन्यपूर्ण सेवा प्रदान करण्याची शिकवण देणे गरजेचे

अंबड ।प्रतिनिधी

महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच एसटीची ओळख आहे.गाव तिथे एसटीची सेवा कौतुकास्पद ठरते. सर्वांची आवडती लालपरीसी जनतेचे अत्यंत जिव्हाळ्याचे आपुलकीचे नाते आहे. परंतु अंबड आगाराच्या उर्मट,मुजोर वाहकांच्या (कंडक्टर) बेजबाबदारपणाचा प्रवाशांना नाहकत्रास सहन करावा लागत आहे. अंबड आगारातील बहुतांशी कंडक्टर विशेष करून महिला कंडक्टरला प्रवाशांच्या सेवेसाठी या एसटीच्या ब्रीद वाक्याचा विसर पडला असल्याचे दिसून येते. प्रवाशांना सौजन्यपूर्ण,नम्रतापूर्वक सेवा प्रदान करणे अत्यंत आवश्यक असताना कंडक्टरच्या उर्मट,मुजरपणाचा प्रवाशांना वारंवार कटू अनुभव येत मनस्ताप सहन करावा लागत आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सौजन्य सप्ताहाचे आयोजन फक्त कागदोपत्री व प्रसिद्धी पुरतेच करत असल्याचे अंबड आगाराच्या बेजबाबदार,मुजोर,उर्मट सेवेवरून म्हणता येऊ शकते.

वयस्कर व्यक्ती, विद्यार्थी, महिला प्रवाशांशी देखील अंबड आगाराचे वाहक सौजन्य पूर्ण व्यवहार करत नाही तर एसटी आपल्या स्वतःच्या घरची जहागीरदारी असल्याच्या तोऱ्यात व प्रवाशांना दिल्या मिळणाऱ्या विविध सवलतीचा लाभ आपल्या मुळेच मिळत असल्याचे वाहकांच्या बेजबाबदार कर्तव्यावरून दिसून येते.

हात दाखवा गाडी थांबवा,प्रवाशांच्या सेवेसाठी या ओळी फक्त जाहिरात बाजीपुरत्या मर्यादित असल्याचे अंबड आहाराकडे पाहून म्हणता येईल अनेक वेळा प्रवाशाचे प्रवासादरम्यान तिकिटाचे राहिलेले शिल्लक पैसे वाहकांना परत मागितल्यास त्यांचा पारा चढतो, नाविलाजाणे प्रवासी निमुटपणे आपल्या निर्धारित स्थळी उतरत चालता होतो. याबाबतीत अंबड आगारातील महिला कंडक्टर आघाडीवर असल्याचे दिसून येते.

अंबड आगाराच्या या उर्मट,मुजोर,बेसिस्त सेवेला लगाम लावत सौजन्यपूर्ण सेवा प्रदान करण्याबाबत वरिष्ठांनी सौजन सप्ताहाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांचे समुपदेशन करणे गरजेचे असल्याची मागणी प्रवासी वर्गातून मोठ्या प्रमाणात होत आहे.अंबड आगारांच्या कर्मचाऱ्यांमुळे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेची प्रतिमा जनसामान्यांच्या मनात मलिन न होता सौजन्य पूर्ण सेवा प्रदान करणे अत्यंत गरजेचे आह





संपादकीय

# गोंधळी नको ; विरोधक अभ्यासू हवेत...

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या सुरुवातीला विधान भवनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ पाहायला मिळाला. काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार नाना पटोले यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर त्यांचे दिवसभरासाठी निलंबन करण्यात आले; परंतु विरोधी पक्षाच्या एका सदस्यांवर कारवाई केली म्हणून विरोधकांनी संपूर्ण दिवसभरातील कामकाजावर बहिष्कार टाकला. त्यामुळे गेले दोन दिवस जनतेच्या प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठवला गेला असे चित्र दिसले नाही.

या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले यांनी थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे धाव घेतली आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलण्याचा प्रयत्न केला. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाल्याचे दिसले. अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. यावेळी सभागृहात जोरदार गदारोळ झाला. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी पटोले यांच्यावर एका दिवसासाठी कारवाई करण्याची घोषणा केली. यानंतर विरोधकांनी अधिक आक्रमक होत घोषणाबाजी केली. या सरकारचे करायचे काय? 'खाली डोकं वर पाय...' माफी मागा... माफी मागा शेतकऱ्यांची माफी मागा... अशी घोषणाबाजी करत सभागृहात गोंधळ घातला. त्यानंतर सर्व विरोधकांनी सभात्याग केला. आता पुढे काय? उद्याही असा एखादा मुद्दा घेऊन विरोधक गोंधळ घालू लागले तर, मूळ कामकाज कसे होणार, याकडे आता लक्ष देण्याची गरज आहे. पावसाळी अधिवेशन पंधरा दिवसांचे असते. या काळात पुन्हा सभागृहात गोंधळ झाला, तर जनतेचे प्रश्न मांडणार कधी असा प्रश्न अनुत्तरित राहणार आहे.

लालफितीत अडकडलेल्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्याचे काम विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या माध्यमातून होते. जनतेतून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सन्मान असला तरी, ज्या जनतेतून तो निवडून येतो, त्याचे प्रश्न, समस्या सरकारच्या माध्यमातून लवकर मार्गी लागाव्यात यासाठी वर्षातून तीन वेळा विधिमंडळाचे अधिवेशन होत असते. नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असल्याने, एक अधिवेशन त्या ठिकाणी होते. अन्य दोन अधिवेशनेही राजधानी मुंबईत होतात. अधिवेशन सुरू होण्याआधी तारांकित प्रश्नांच्या माध्यमातून ४५ दिवस आधी जे प्रश्न विचारले जातात, त्याची उत्तरे संबंधित मंत्र्यांला लेखी स्वरूपात द्यावी लागतात. लक्षवेधी प्रश्न, हरकतीचा मुद्दा, औचित्यांचा मुद्दा, विशेष चर्चा आदींबाबत आमदारांना असलेल्या अधिकारांतून जास्तीत जास्त जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवला जाईल, अशी अपेक्षा असते. सर्वसाधारणपणे सभागृहात एखाद्या लोकप्रतिनिधीने मत मांडले ते खरे आहे असे मानून मंत्र्यांकडून त्यावर उत्तर दिले जाते; परंतु अलीकडच्या काळातील अधिवेशनातील कामकाज पाहता, जनतेच्या प्रश्नांवर सभागृहात चर्चा घडवून आणण्यापेक्षा किंवा या चर्चेत सहभागी होण्यापेक्षा विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्यात आमदारांना अधिक रस असल्याचे दिसून येते. पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनाला इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून प्रसिद्धी मिळत असल्याने, आपला चेहरा त्यात दिसावा

## चुकीची दुरूस्ती

काल बुधवार,दि.०२ जुलै २०२५
WEDNESDAY, DT.02 JULY 2025
रोजीच्या अंकाची तारिख नजरचुकीने
मंगळवार दि.०२ जुलै २०२५ अशी छापण्यात आली आहे.
तरी त्या तारखेचा अंक बुधवार,दि.०२ जुलै २०२५
रोजीचा गृहीत धरावा.

- व्यवस्थापक

# अँड. राजेशआर्सुळ यांना मातृशोक

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील पिंगळे गल्लीतील रहिवासी अँड. राजेश दिगंबरराव अर्सुळ यांच्या मातोश्री श्रीमती सुमित्राबाई दिगंबरराव आर्सुळ यांचे



वयाच्या ८५ व्या वर्षी राहते घरी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी दिनांक ३ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता अमरधाम स्मशानभूमी मोंढा रोड बीड येथे होणार आहे. श्रीमती सुमित्राबाई दिगंबरराव अर्सूळ या बीड शहरातील नामांकित फौजदारी वकील कै. दिगंबरराव आरसूळ यांच्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात मुले एडवोकेट राजेश, संजय, विलास व मुलगी जयंती, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अर्सुळ परिवारावर कोसळलेल्या दुखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

# वाहनधारकाना गाडी चालवणे झाले अवघड झाल्याने टिटवी रोडवरील खड्डे

## तात्काळ बुजविण्यात यावेत - ठाकरे शिवसैनिक गुलाबराव पाटील कोलते

सावळदबारा ।प्रतिनिधी

सावळदबारा -टिटवी रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. हे खड्डे मोठ मोठे होत आहेत. या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.त्यामुळे संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते व वाहनधारक यांनी केली आहेत.टिटवी रोडवरील खड्डे मोठ मोठे होत आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहनधारकना गाडी चालवाताना अवघड होत आहेत.सावळदबारा येथे श्री चक्रधर स्वामीचे मंदिर आहे.दर्शन घेण्यासाठी भाविक भक्त सावळदबारा येथे येतात. याच रस्त्यावरून ये जा करतात.टिटवी रोडवर हे खड्डे मोठमोठे होत आहेत आणि त्यातील गिट्टी बाहेर आली आहे. संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते

# कोविड च्या काळात आरोग्य विभागाने सीमेवरील सैनिकांसारखे कर्तव्य बजावले- माजी आमदार संतोष सांबरे

बदनापूर ।प्रतिनिधी

सामान्य रुग्णालय येथील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी दिलीपराव मोहिते पाटील यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमात काढले गौरौद्गारसामान्य रुग्णालय जालना येथील वैज्ञानिक अधिकारी दिलीपराव मोहिते यांच्या सेवापूर्ती कार्यक्रम दिनांक ३० जून २०२५ सोमवार रोजी पार पडला असून याप्रसंगी माजी आमदार संतोष सांबरे यांची प्रमुख उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक राजेंद्र पाटील जिल्हा क्षयरोग अधिकारी गोपाल कुंडलीकर वैद्यकीय अधिकारी प्रदीप कुलकर्णी डॉक्टर राजेंद्र शेजुळे आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना माजी आमदार संतोष सांबरे म्हणाले की आमच्या बदनापूर विधानसभा मतदारसंघातील गोषेगाव तालुका भोकरदन येथील रहिवासी असलेले वैज्ञानिक अधिकारी दिलीपराव मोहिते यांनी आरोग्य विभागासाठी मोलाची कामगिरी केली असून कोविडच्या काळात त्यांनी उत्तम प्रकारे चाचण्या घेऊन त्यांना योग्य रीतीने हाताळले कोविडच्या काळात आरोग्य विभागाने सीमेवरील सैनिकासारखे कर्तव्य बजावले असून सैनिक ज्याप्रमाणे देशाचे रक्षण करतो त्याचबरोबर सैनिकासारखंच आरोग्य च्या दृष्टिकोनातून जे कर्तव्य पार पाडता येईल ते अगदी निष्ठेने पार पाडले म्हणूनच आपण कोरोनाला हद्दपार करू शकलो कोरोनाला हद्दपार करण्यासाठी आरोग्य विभागाची सर्वात मोठी जबाबदारी होती आणि ती त्यांनी लिहिलेल्या पेलत हे आव्हान संपुष्टात आणले कोरोनाला हरवून त्यांनी आरोग्य बाबतचा मोठा विजय मिळवला होता महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब तसेच आरोग्य मंत्री राजेश भैय्या टोपे साहेब यांनी कोविड काळामध्ये ज्या पद्धतीने यंत्रणा कामाला लावून राज्यातील जनतेच्या सुरक्षेची आरोग्याची काळजी घेतली त्यांना आरोग्य विभागाने मोलाची साथ दिली होती त्या आरोग्य विभागाच्या मुलाच्या कामगिरीमुळे आपण कोरोनाचा महामुकाबला करू शकलो असेही माजी आमदार संतोष सांबरे म्हणाले.

यावेळी बोलताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ राजेंद्र पाटील म्हणाले की, श्री मोहिते हे सामान्य शेतकरी कुटुंबातून येऊन त्यांचा लॅब असिस्टंट ते प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी पदापर्यंतचा कार्यकाळ अत्यंत वाखाणण्याजोगा असून त्यांचे कार्य आरोग्य विभागासाठी मोलाचे आहे जालना जिल्ह्यात कोरोना काळामध्ये पहिल्या रुग्णांचा स्वाब घेऊन तो यशस्वीरित्या पॉझिटिव्ह आल्यानंतर हाताळण्या व उपाययोजना करण्यामध्ये त्यांनी



मोलाची जबाबदारी पार पाडली, सामान्य रुग्णालयात सर्वांशी आपुलकीने वागण्याचा त्यांचा स्वभाव असून त्यांचे सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध जोपासण्याचे काम त्यांनी आपल्या कार्यकाळात केलेला आहे. त्यांनी आरोग्य यंत्रणेच्या माध्यमातून कोरोनाला हरवून कर्तृत्वावर यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली असेही डॉक्टर पाटील म्हणाले.

याप्रसंगी जिल्हा सामान्य रुग्णालय येथील श्री. विश्वनाथ नाईक यांनी सूत्रसंचालन केले तर आभार प्रदर्शन मीराताई मोहिते यांनी केले यावेळी श्री.संजयजी पवार श्री.सचिनजी कावळे श्री. शैलेशजी साडेगावकर व आदिल भाई डॉ.राजेंद्र शेजुळे श्री लहुजी उगले,श्री राहुलजी अंबुजकर,सौरभ मोहिते पाटील,श्री गजाननजी काळे डॉ.परशुराम नागदरवाड आदींची उपस्थिती होती.



# साई मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये डॉक्टर्स डे साजरा

बदनापूर।प्रतिनिधी

राष्ट्रीय डॉक्टर दिनानिमित्त आज, १ जुलै, मंगळवार रोजी साई मॉडर्न इंग्लिश स्कूल येथे डॉक्टर्स डे साजरा करण्यात आला.हा दिवस डॉ. बिधानचंद्र रॉय यांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो, ज्यांनी वैद्यकीय क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. यावर्षी, डॉक्टरांच्या निस्वार्थ सेवेचा आणि त्यागाचा गौरव करण्यासाठी, तसेच त्यांच्या योगदानाला आदरांजली वाहण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. प्रसंगी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे गिते हॉस्पिटल चे डॉ. अनील गिते यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळे आजार, योग्य आहार, जंक फूड चे दुष्परिणाम, दाताची काळजी, शारीरिक स्वच्छता या विषयावर मार्गदर्शन केले.

आज वयोगट ४ ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.प्रसंगी मार्गदर्शक व निवृत्त पोलीस निरीक्षक श्री बळिराम गिते, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ करूणा जाधव, सर्व शिक्षकवृंद यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ सपना अगरवाल यांनी केले.



बीड - कै वसंतराव नाईक यांची ११२ वी जयंती वसंतराव नाईक विकास महामंडळ जिल्हा कार्यालय बीड येथे साजरी करण्यात आली. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते शरदभाऊ राठोड, भुषणभाऊ पवार, प्रियदर्शनी बँकेचे अध्यक्ष अशोक लोढा, मयुरी ताई बांगर, नितीन जायभाय तसेच कार्यालयातील अधिकारी कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## भारत टॅलेंट सर्च परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवान विद्यार्थ्यांचा मत्स्योदरी

# करिअर अकॅडमी येथे बक्षीस वितरण कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

अंबड ।प्रतिनिधी

भारत टॅलेंट सर्च परीक्षेचा पेपर वैद्यराज प्राथमिक व माध्यमिक विद्यालय अंबड व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाचेगाव अशा दोन केंद्रावर झाला होता. या परीक्षेमध्ये हस्तपोखरी, मसई, दूधपुरी,ढालसखेडा, माळीवाडी,बाचेगाव, सिद्धेश्वर पिंपळगाव , रवना ,भालगाव, झिरपी, दाढेगाव, बारसवाडा , पारनेर तांडा , वडीकाळ्या आदी शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते, त्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मत्स्योदरी स्पर्धा परीक्षा केंद्र अंबड येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटक गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी रामेश्वरजी मुळक, कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवव्याख्याते गणेश गिरी सर, गोकुळ राजपूत, प्रमुख पाहुणे जालना सायबर सेलचे पोलीस अधिकारी योगेश चव्हाण, वैद्यराज माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकांत जायभाय, साठे कोचिंग क्लासेसचे संचालक महेश साठे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात आला. सर्वप्रथम स्त्री शिक्षणाच्या जनक क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.




रामेश्वरजी मुळक यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे व्याख्यान दिले असून अनेक गरिबी तून कलेक्टर, पोलीस अधीक्षक, झालेल्या अधिकाऱ्याचे उदाहरणे दिली असून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी सविस्तर माहिती दिली आहे. तसेच सायबर सेलचे पोलीस अधिकारी योगेश चव्हाण यांनी मोबाईल मधील अनेक प विषयी माहिती सांगितली असून आपला मोबाईल व्यवस्थित रित्या हाताळला गेला नाही तर त्याचे काय परिणाम होतात हे समजावून सांगितले.

यावेळी आयोजक नितीन रोहोकले, दत्तात्रय धुमाळ, दिलीप तौर, योगशिक्षक गजानन पांडुरंग पुरी, सुधाकर खाडे सर , दत्तात्रय शिंदे सर, बहिर सर, दोरखे सर, शशिकांत कावळे सर , वाघ सर, सानप सर, लांडगे मॅडम , सय्यद मॅडम , निवृत्ती शिंदे सर ,प्रकाश कवडे सर , पालवे सर , नितीन कोल्हे सर, हर्षे सर , रक्ताटे सर, पेदाटे सर , रेपाटे सर , सूर्यवंशी सर , आदी शिक्षक व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंबड तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांच्याकडून वाळू माफिया विरुद्ध दबंग कारवाईचा सपाटा

## अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाळू तस्करांकडून ५३ लाख दंड वसूल तर ८ कोटी ७/१२ वर बोजा

फारुक शेख :- अंबड-घनसावंगी तालुक्यातील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करुन व चोरट्या मार्गाने वाहतूक करणाऱ्या वाळू तस्करांचा नदीपात्रात गेल्या अनेक वर्षांपासून हैदोस घातला होता वाळू माफियाला रोखण्यासाठी तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांनी धडक कारवाई करत अनेक वाळू माफियांवर थेट कारवाई केली आहे.वाळूची चोरटी वाहतूक व विक्री मोठ्या प्रमाणात केली जात असल्याने अवैधरित्या होत असलेले वाळू उत्खनन व वाळू चोरीचे प्रकार थांबविण्यासाठी तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांनी लक्ष घालून यासाठी पथकाची नियुक्ती केली असून त्याच प्रमाणे नदीकाठच्या गावातील तलाठी व मंडळ अधिकारी यांनाही वाळूची अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याचे आदेश तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांनी दिलेले आहेत

.तालुक्यातील अनेक भागात अवैधरित्या वाळूचे उत्खनन वाहतूक व विक्री केली जात आहे या अवैध वाहतूक व विक्री मुळे मोठ्या प्रमाणात शासनाचा महसूल बुडत असल्याने तसेच यावर कठोर कारवाईची मागणी वेळोवेळी नागरिकांकडून होत असल्याने तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांनी अवैधरित्या वाळू उत्खनन करुन वाहतूक व विक्री करणाऱ्या वाहनांवर धडाकेबाज




कारवाया होत असल्याने आर्थिक वर्ष २०२४-२५ या वर्षामध्ये ४८ वाहनांवर कारवाई करण्यात आलेली असून संबंधित १६ वाहन धारकांकडून एकूण दंडाची रक्कम ३२९०३७४/- लक्ष वसूल करण्यात आला आहे तसेच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये गौण खनिजांची अवैध उत्खनन व वाहतूक करताना करण्यात आलेल्या वाहनांवर दंड आकारण्यात आलेला असून आजपावेतो दंडाची रक्कम शासनाखाती नाही भरलेल्या एकूण ३० वाहनांच्या आर.सी.बुकवर एकूण रक्कम ६६४५२००/- लक्ष रुपये बोजा चढवून सदर वाहनाचे खरेदी विक्री तसेच इन्सुरन्स व्यवहार थांबविण्यात आले आहे. तसेच खनिजांची अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या व्यक्तींवर विविध प्रकारामध्ये फौजदारी गुन्हे दाखल असलेल्या १० व्यक्तीवर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे.तसेच अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन करून वाहतूक करणाऱ्या २१ व्यक्तीवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे तसेच २०२५-२६ मध्ये २९ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून दंडाची रक्कम २०.८३ लक्ष वसूल करण्यात आले आहे.अवैध गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूक केल्याप्रकरणी आजरोजी पर्यंत १११ लोकांवरती फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले असून संबंधित ६२ व्यक्तीच्या ७/१२ वरती ७.५१ कोटी बोजा चढविण्यात आलेला आहे तर १० व्यक्तीवर तडीपारीची कारवाई करण्यात आलेली आहे.अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होत असल्याने वाळू तस्कर धास्तावले आहेत. अंबड तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांनी गेल्या काही महिन्यांपासून अवैधरित्या वाळू उपसा करुन वाहतूक करणाऱ्यांवर कारवाईचा फास आवळला असून गौण खनिजा बाबत कारवाईचा धडाका हाती घेतल्याने अवैध वाळू वाहतूक दारांमध्ये धडकी भरली असून अवैधरित्या वाळू उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांवर धडाकेबाज कारवाई करत असल्याने सर्वसामान्यमधून समाधान व्यक्त केले जात आहे.अंबड-घनसावंगी तालुक्यात अनेक वर्षांपासून अवैध वाळू उत्खनन व वाहतूक तसेच इतर अवैध धंद्याविरुध्द पहिल्यांदाच अवैधरित्या वाळू उत्खनन व वाळू वाहतूक करणाऱ्या वाळू तस्करांवर कारवायाचा सपाटा व प्रशासनाची दहशत निर्माण करण्यात तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांना यश आले आहे.

# श्री क्षेत्र दत्त संस्थान येथे गुरुपौर्णिमा उत्सव व श्रीमद गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन

### श्रींच्या नुतून रजत मुर्ती चलप्राणप्रतिष्ठा निमित्ताने २ दिवसीय दत्तयागाचे आयोजन; दत्तउपासक गुरूवर्य धर्माचार्य श्रीहरी महाराज पवार यांच्या अधिपत्याखाली भव्यदिव्य सोहळा

बीड (प्रतिनिधी)

प्रति गाणगापूर अशी ओळख असलेले श्री क्षेत्र दत्त संस्थान,कोल्हारवाडी फाटा,बीड येथे गुरुपौर्णिमा उत्सवा निमित्ताने श्रीमद् गुरुचरित्र पारायण व गुरुपौर्णिमा उत्सव सोहळा आयोजित केला आहे.तब्बल १५ वर्षांची परंपरा जपत श्री अवधुत दत्त देवस्थान च्या वतिने दि.०३ जुलै गुरुवार ते १० जुलै गुरुवार या कालावधीत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये श्रीमद् गुरुचरित्र पारायण,श्रींची पुजा व आरती, हरिपाठ,श्री दत्त महामाला मंत्र जप



अनुष्ठान,दत्तयाग हवन व अन्नदान असे दैनंदिन कार्यक्रमाचे आयोजन आहे.महाराष्ट्रात नामांकित असलेल्या या सोहळ्यात सकाळी ९ ते १२ श्रीमद् गुरुचरित्र पारायण, दुपारी १२:३० श्रींची पुजा व आरती,संध्या ५ वा.हरिपाठ व श्री दत्त महामाला मंत्र अनुष्ठान व संध्या ७:३० वा श्रींची सांज आरती होईल.दि.९ जुलै व १० जुलै रोजी श्रींच्या नुतून रजत मुर्ती चलप्राणप्रतिष्ठा निमित्ताने २ दिवसीय दत्तयाग होईल.दि.१० जुलै गुरुवार गुरूपौर्णिमा या दिवशी दुपारी १२ वा. श्रींची महाआरती होईल व तदनंतर संस्थान तर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.तसेच सामुहिक गुरुमंत्र सोहळा दुपारी २ वाजता होऊन सायंकाळी ७ ते १० यावेळेत श्रींचा पालखी सोहळा होईल.तरी पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री क्षेत्र दत्त संस्थानचे दत्तउपासक गुरूवर्य धर्माचार्य श्रीहरी महाराज पवार यांनी केले आहे.

### बीडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

# डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून अ.भा.म. नाट्य परिषद, के.एस.के. महाविद्यालयाचा उपक्रम

बीड (प्रतिनिधी)

ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात आनंदाची रंगत निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्यासाठी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची बीड शाखा व सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालयातील नाट्यशास्त्र व संगीत विभागाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांसाठी बीडमध्ये येत्या दि.१७ जुलै रोजी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या बीड शाखा अध्यक्ष डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून ज्येष्ठ नागरिकांसाठी



उपक्रमाचे दरवर्षी आयोजन केले जाते. यामध्ये गीत गायन, नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टँडअप कॉमेडी आदी कार्यक्रमांचा समावेश असणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, तसेच तरुण वयात जोपासता न आलेले छंद साकार करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक ज्येष्ठ नागरिकांनी आपली नावे नोंदवावीत, त्यासाठी डॉ.दुष्यंत रामटेके ९७६७३५५२९४, डॉ.संजय पाटील देवळाणकर ९४२२२९५३१४, डॉ.राहुल सोनवणे ९८२२५७७६७१, डॉ.दीपक जमधाडे ८८८८८५०३५८, डॉ.अनिता शिंदे ७२७८३०५०५०, प्रा.विजय राख ९८३३३४५८०९, सुरेश थोरात ९४२२९११०९० यांच्याशी संपर्क करावा, असे संयोजकांनी म्हटले आहे.



## शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालय मूर्ती,येथे हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांची जयंती' उत्साहात साजरी

घनसावंगी (प्रतिनिधी)

काल दि. ०१/०७/२०२५ मंगळवार रोजी, शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालय,मूर्ती ता. घनसावंगी जि. जालना. येथे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती' साजरी करण्यात आली. या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री ज्ञानदेव सोळंके हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणुन सहशिक्षक श्री शिवहरी कायंदे हे उपस्थित होते.यावेळी सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते, वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुजन करुन,त्यांना अभिवादन करण्यात आले.तसेच विद्यार्थी मनोगताचा कार्यक्रम घेण्यात आला.त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमूख पाहुणे यांनी, वसंतराव नाईक यांचे 'जीवन व कार्य' या विषयी अमुल्य मर्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सहशिक्षक भिमाशंकर शिंदे यांनी केले, तर आभार सहशिक्षक श्री विष्णू नागरे यांनी मानले.यावेळी विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त माजलगाव येथे कृषी दिन साजरा

माजलगाव (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासन कृषी विभाग आणि पंचायत समिती माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमानाने १ जुलै हा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतरावजी नाईक साहेब यांची जयंती कृषी दिन म्हणून पंचायती समिती सभागृह माजलगाव येथे साजरा करण्यात आले

कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती ज्योत्सना मुळीक प्रशासक तथा गट विकास अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांच्या हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना श्री एस एस भोकरे कृषी अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांनी स्व.वसंतरावजी नाईक यांचे जीवन चरित्र व कार्य याविषयी उपस्थितना माहिती दिली प्रमुख मार्गदर्शक श्री अतिश चाटे मंडळ कृषी अधिकारी केसापुरी यांनी सध्याच्या परिस्थितीमध्ये पिकाचे संरक्षण करण्याविषयी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर श्री गणेश बादाडे तालुका कृषी अधिकारी माजलगाव यांनी स्व.वसंतरावजी नाईक साहेब यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्य व अमुलाग्र बदल तसेच शेतकऱ्यांना सध्याच्या परिस्थितीमध्ये शेतीमध्ये असणाऱ्या अडचणीवर मात करून नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीमधील उत्पादन वाढवण्या विषयी शेतकऱ्यांना संबोधित केले या कार्यक्रमात सन २०२४ -२५ मध्ये घेण्यात आलेल्या विविध पीक स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. श्री डोंगरे साहेब सहाय्यक गट विकास



अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिंदे उद्यान पंडित आणि अण्णासाहेब जगताप वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी उपस्थित होते सदरील कार्यक्रमाला कृषी विभागातील आणि पंचायत समिती येथील अधिकारी,कर्मचारी तसेच कृषी सखी आणि शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गोपीनाथ पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी केले व आभार श्री डी. एल. गडपाळे कृषी अधिकारी पंचायत समिती माजलगाव यांनी मानले

# नगरपरिषद कार्यालयासमोर सय्यद सलीमबापुंच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको

### आंदोलकांनी विविध मागण्या लावून धरत मुख्याधिकाऱ्यांना आणले ताळ्यावर

माजलगाव (प्रतिनिधी)

शहरातील नागरी समस्या संदर्भात असणाऱ्या प्रश्नांसह विविध मागण्या लावून धरत आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने सय्यद सलीमबापू यांनी सोमवार दि.३० रोजी सकाळी नगरपरिषद कार्यालय समोर रास्ता रोको केला. यावेळी आंबेडकरी विचार मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या कामकाजाविषयी निषेधाच्या घोषणा करत मुख्याधिकाऱ्यांना ताळ्यावर आणले.माजलगाव नगर परिषदेमध्ये कार्यरत असलेले प्रशासक तथा मुख्याधिकारी चंद्रकांत चव्हाण यांचा मनमानी कारभार सुरू आहे.जनतेची अनेक कामे खोळंबली आहेत.परंतु पालिका प्रशासन गेंड्याची कातडी पांघरून आहे.या धोरणाविरुद्ध समाजसेवक व आंबेडकरी




विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी एल्गार पुकारला. संघटनेच्या वतीने वतीने सोमवार दि.३० जुन २०२५ रोजी नगर परिषदेसमोर रास्ता रोको केला.

यावेळी कार्यकर्त्यांनी नगर परिषदेच्या ढिसाळ कामाचा निषेध व्यक्त करत घोषणाबाजी केली. शहरातील नगरपरिषद हद्दीमध्ये किरायदार,भोगवटदार,बेघर या गोरगरीब लोकांना घरकुल देण्यात यावे.आलेले नाही. याला मंजुरी देण्यात यावी.आझाद नगर येथे अर्धवट रस्ता तयार करण्यात आलेला आहे,तो पूर्ण करण्यात यावा.सन २०२० ते २०२५ या वर्षात नगरपरिषद माजलगाव यांनी किती गुंठेवारी केल्या याची यादी देण्यात यावी.किती लोकांना ओपनस्पेच्या बोगस पिटीआर देण्यात आल्या याची माहिती देण्यात यावी.शहरात किती ओपनस्पेस,डीपीरोड आहेत याची माहिती देण्यात यावी.इत्यादी मागण्या यावेळी कार्यकर्त्यांनी लावून धरल्या.सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरी विचारू मोर्चाच्या वतीने केलेल्या भव्य रास्ता रोकोने धास्तावलेले पालिका प्रशासन ताळ्यावर आले.दरम्यान प्रशासनाच्या वतीने मागण्यांसंदर्भात ठोस निर्णय घेण्याचे अभिवचन आंदोलकांना दिले.या आंदोलनात आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू,एडवोकेट सय्यद अल्ताफ,यांच्यासह संघटनेचे शेकडो पदाधिकारी सहभागी होते.

## खाजगी कोचिंग क्लासेस वाल्याची मनमाणी खपवून घेतली जाणार नाही : विकास गायकवाड

गेवराई (प्रतिनिधी)

खाजगी क्लासेसच्या नावाखाली शहरात सुरू असलेले घाणेरडे प्रकार संताप जनक असून जिल्ह्याभरात खाजगी क्लासेस मोठ्या प्रमाणात चालत आहे या क्लासेस मध्ये विद्यार्थ्यांना शिकवण देणारे शिक्षक यांचे चारित्र्य प्रमाणपत्र तपासणे अत्यंत गरजेचे झाले असून आत्ताच झालेल्या बीड शहरात उमाकीरण शैक्षणिक संकुल मध्ये घडलेल्या प्रकारामुळे पालक वर्गात संताप व्यक्त करण्यात येत आहे जिल्हाभरात खाजगी क्लासेस वाल्या विरोधात पालक वर्गातून नाराजीव्यक्त करण्यात येत आहे त्यामुळे खाजगी क्लासेस मधील मुलींच्या सुरक्षेतेच्या प्रश्न निर्माण झाला आहे शहरातील बहुतांश खाजगी क्लासेस समोर मुलींची छेडछाड करणे विनयभंग करणे असले निंदनीय प्रकार घडत असतात अशा निंदनीय प्रकारास सर्वस्व क्लासेसचे संचालक जबाबदार असतात कारण बहुतांश क्लासेस समोर काही कारण नसताना सुद्धा काही टवाळखोर मुलं विनाकारण थांबलेले असतात क्लासेस वाल्याने विद्यार्थी सुटण्याच्या वेळेस एक पोलीस डिपार्टमेंटचा माणूस गेट समोर असणे अनिवार्य असले पाहिजे प्रतेक खाजगी क्लासेस हा सीसीटीव्हीच्या निगराणित असला पाहिजे जोपर्यंत सर्व विद्यार्थी त्यांच्या स्वतःच्या घरी पोहोचत नाहीत तोपर्यंतची सर्व जिम्मेदारी क्लासेस वाल्यांची असली पाहिजे . त्यामुळे असले निंदनीय प्रकार घडणार नाहीत यांची काळजी घेतली पाहिजे जर का एखाद्या क्लासेस समोर अशी निंदणी घटना घडली तरअशा घटनेस सर्वस्व जबाबदार क्लासेस वाल्याला धरून त्यांच्यावर सुद्धा योग्य ती कारवाई केली पाहिजे पालक आपल्या मुलांचे भविष्य घडविण्यासाठी खाजगी क्लासेस मध्ये मोठी फीस भरून ऍडमिशन घेतात त्या क्लासेस मध्ये आपल्या मुलांना शिकवण देणारे शिक्षक यांची सुद्धा चारित्र्य तपासणी अनिवार्य असले पाहिजे आशा विकृत लोकांमुळे समाजात चुकीचा संदेश जात आहे तरी यापुढे बीड जिल्ह्यातील सर्व क्लासेस वाल्यांना यापुढे जर का असे प्रकार झाल्यास आमच्या विद्यार्थी मित्रासाठी व आमच्या लाडक्या बहिणीच्या रक्षणासाठी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष मैदानात उतरेल जर का शहरातील कुठल्याही क्लासेस समोर असे प्रकार आमच्या निदर्शनास आले तर आम्ही महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने खाजगी क्लासेस वाल्यांच्या तोंडाला काळे फासले जाईल असा थेट इशारा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे



# हातभट्टीची दारु तयार करुन तिचा चोरटा व्यापार करणाऱ्या इसमाची हर्सल कारागृहात रवानगी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयाची धुरा सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत.त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवुन चझऊ- कायद्या अंतर्गत विविध हेड खाली बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषघांने पोनि पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण, यांनी दिनांक ३१.०५.२०२५ रोजी इसम नामे ईब्बु काशीम नुरीवाले वय ३४ वर्षे रा. गवळीपुरा अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड याचे विरुद्ध चझऊ-कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.सदर स्थानबध्द इसमा विरुद्ध पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण येथे हातभट्टीची दारू तयार करणे, ताब्यात बाळगणे, चोरटी विक्री करणे, हातभट्टीच्या दारुची वाहतुक करणे वगैरे स्वरुपाचे ०९ गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. त्यापैकी ०७ गुन्हे न्यायप्रविष्ट असुन ०२ गुन्हे पोलीस तपासावर आहेत, सदरील इसम हा हातभट्टीच्या दारुची निर्मीती व चोरटा व्यापार करीत असल्याने पोलीसांची त्याचेवर बऱ्याच दिवसांपासून करडी नजर होती. सदर इसम हा पोलीसांची नजर चुकवुन हातभट्टीच्या दारुची चोरटी वाहतुक व व्यापार करीत होता. सदर इसमावर यापूर्वी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ९३ प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानता पुन्हा जोमाने हातभट्टीची दारू ताब्यात बाळगुन तिची चोरटी निर्मीती व विक्री करण्याबाबतचे गुन्हे करण्याचे चालुच ठेवुन होता. त्यामुळे पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण हद्दीत व अंबाजोगाई शहरात व परिसरातील सर्वसामान्य नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता.सदर प्रकरणात श्री. विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक ३०.०६.२०२५ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था व सर्वसामान्य जनतेचे आरोग्य चांगले रहावे हा उदात्त दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्सल कारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्द करणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सूचना पोनि अंबाजोगाई ग्रामीण व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत सदर इसमास दिनांक ०१.०७.२०२५ रोजी ताब्यात घेऊन पो. स्टे. अंबाजोगाई ग्रामीण येथे हजर केले. पो.नि. अंबाजोगाई ग्रामीण यांनी सदर इसमास दिनांक ०१.०७.२०२५ रोजी १५.२६ वा. कायदेशीररीत्या ताब्यात घेऊन योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानबध्द करणे करीता रवाना केले आहे.सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपोअ अंबाजोगाई श्रीमती. चेतना तिडके, उविपोअ अंबाजोगाई श्री. चोरमले यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.श्री शिवाजी बंटेवाड, स्थागुशा बीड, पो.नि. मुरलीधर खोकले, पोउपनि रहीम चौधरी, पोह/ कल्याण देशमाने, महेश भागवत, बापु राउत, जयदीप कसबे सर्व पो.स्टे. अंबाजोगाई ग्रा. यांचेसह, पोउपनि सुशांत सुतळे, सपोउपनि अभिमन्यु औताडे, विष्णु सानप, मारुती कांबळे, भागवत शेलार, आनंद मस्के, अतुल हराळे, बिभीषण चव्हाण स्थागुशा बीड यांनी केलेली आहे. भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती व जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या व खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर जास्तीत जास्त चझऊ-कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिले आहेत.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ५४९ / २०२५**
**गयाबाई मच्छिंद्र रावडे विरूध्द – निरंक**
**(मार्फत अँड. आय एस धापसे)**

ज्याअर्थी मयत नाम मच्छिंद्र साहेबराव रावडे हे दिनांक २०.०३.२०२३ रोजी धोंडराई ता.गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार १.गयाबाई मच्छिंद्र रावडे
वय ५८ वर्षे धंदा शेती रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड
२.सुरेश मच्छिंद्र रावडे
वय ३० वर्षे धंदा शेती
रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड
३. रेखा गणेश मोरे
वय ३६ वर्षे धंदा शेती
रा. तळणेवाडी ता. गेवराई जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे मच्छिंद्र साहेबराव रावडे रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : ११.०८.२०२५

**स्वाक्षरित/–**
**कनिष्ठ लिपीक**
**सह दिवाणी न्यायालय**
**क स्तर,गेवराई**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/–**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर,गेवराई**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई, जि. बीड येथील**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५२३/२०२५**
**सोपान गंगाराम काळे व इतर वि निरंक**
**(मार्फत– अॅड. आय. एस. धापसे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे गंगाराम पि. गोविंदराव काळे रा. पाडळशिंगी ता. गेवराई जि. बीड हे / ह्या दिनांक ०९/०७/२०१७ रोजी पाडळशिंगी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १ सोपान पि. गंगाराम काळे, वय – ५० वर्षे, धंदा नौकरी, रा. पाडळशिंगी ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. २ संदिपान पि. गंगाराम काळे, वय – ६० वर्षे, धंदा शेती, रा. सदर, अर्जदार क. ३ उर्मिला भ्र. तुकाराम काळे, वय – ६२ वर्षे, धंदा – घरकाम व शेती, रा. सदर, अर्जदार क. ४ कुंडलिक पि. तुकाराम काळे, वय – ३८ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, अर्जदार क. ५ विठ्ठल पि. तुकाराम काळे, वय – वर्षे, धंदा नौकरी, रा. सदर यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या व गैरअर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत गंगाराम पि. गोविंदराव काळे रा. पाडळशिंगी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख ०५/०८/२०२५

**स्वाक्षरित/–**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर,गेवराई**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित/–**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर,गेवराई**

# ना. पंकजाताई मुंडेंचा पुढाकार ; गडहिंग्लज प्रशासकीय इमारतीला उपलब्ध करून दिली पशुसंवर्धनची जागा - अनेक वर्षांपासूनचा प्रश्न लागला मार्गी

## उप मुख्यमंत्री अजित पवार – ना. पंकजाताई मुंडे यांच्यात बैठक ; मंत्री हसन मुश्रीफ यांनी मानले पंकजाताईंचे आभार

नवीन इमारतीत पशुसंवर्धन विभागालाही मिळणार स्वतंत्र कार्यालय

मुंबई ।प्रतिनिधी

गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) येथील उप विभागीय कार्यालयाच्या जागेचा प्रश्न अखेर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने मार्गी लागला आहे. उप मुख्यमंत्री अजित पवार आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्यात आज झालेल्या बैठकीत पशुसंवर्धन विभागाने त्यांची ७५ आर जमीन यासाठी उपलब्ध करून दिली आहे. दरम्यान या नवीन इमारतीत पशुसंवर्धन विभागाचे देखील स्वतंत्र कार्यालय असणार आहे. दरम्यान मंत्री हसन मुश्रीफ यांनी याबद्दल ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली व ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत आज विधानभवनातील त्यांच्या समिती कक्षात कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ,आमदार आशुतोष काळे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, पशुसंवर्धन विभागाचे सचिव रामास्वामी ए., पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (व्ही.सी.द्वारे) व अन्य संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते. कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज शहरामध्ये मध्यवर्ती ठिकाणी पशुसंवर्धन विभागाची ३.०६ एकर जागा आहे. त्यापैकी ०.७५ हे.आर. जागा पशुसंवर्धन विभागाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी उपलब्ध करून द्यावी तसेच पशुसंवर्धन विभागाच्या पुनर्रचनेनुसार नवीन तालुका पशुसंवर्धन व दुग्धविकास उपायुक्त या कार्यालयासाठी स्वतंत्र मजला प्रस्तावित बांधकामांमध्ये समाविष्ट करावा, उर्वरित जागा पशुसंवर्धन विभागाकडे ठेवावी असा निर्णय बैठकीत झाला.

गडहिंग्लज हे उपविभागीय कार्यालय असलेले शहर आहे. या ठिकाणी प्रांत कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता, सहकार, कृषी इत्यादी कार्यालय आहेत आणि ती सर्व भाड्याच्या जागेत आहेत. नवीन इमारतीसाठी जागा उपलब्ध नव्हती. ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने ती आता पशुसंवर्धन विभागाने उपलब्ध करून



देण्याचा निर्णय घेतल्यामुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सर्व महत्त्वाच्या विभागांच्या कार्यालयासाठी एकत्र प्रशासकीय इमारत बांधणे शक्य होणार आहे. त्यासाठी आवश्यक निधी देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.मुश्रीफ यांनी मानले पंकजा मुंडेंचे आभार प्रशासकीय इमारतीला पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासूनचा

# ग्रंथपाल गोपाल सगर यांना पीएचडी पदवी प्रदान

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील ग्रंथपाल गोपाळ सगर यांना नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील माहिती व ज्ञान स्रोत केंद्रास Impact of ICT on information seeking behaviour of NAAC Accridited A Grade College Teachers in Marathwada Region या विषयावरील शोध प्रबंध सादर केला होता. त्यांची पीएचडी मौखिक परीक्षा २ जुलै २०२५ रोजी संपन्न होऊन त्यांना विद्यापीठाच्या वतीने पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. यासाठी



मार्गदर्शक म्हणून डॉ. गोविंद घोगरे यांनी कार्य केले. त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते शाल व पुष्पहार देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे कार्यालय अधीक्षक श्री. वायाळ सर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांचे उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# आदित्य कृषि महाविद्यालयाच्या कृषीदुतांकडून अंथरवन पिंपरी येथे कृषीदिनानिमित्त वृक्ष लागवड

बीड ।प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित व आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषीदूत ,सुनील मदने, बाबासाहेब पल्हाळ, सचिन धुमाळ, गणेश ढोले, दयानंद सिरसट, योगेश मोरे, रेहान सय्यद, संदीप करडकर, श्रीदीप वळेकर, धीरज पवार, चैतन्य पाटील यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव २०२५-२६ अंतर्गत अंथरवन पिंपरी गावात ०१ जुलै रोजी कृषी दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंथरून पिंपरी येथील विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीने झाली. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांचे कृषी क्षेत्रातील क्रांतिकारी योगदान यांविषयी कृषीदुतांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर कृषी दिनाची पार्श्वभूमी, कृषी दिनाचे महत्त्व आणि कृषिप्रधान देशात कृषी दिन एक पावन पर्व म्हणून का ओळखला जातो या संदर्भात माहिती दिली. कृषी दिनानिमित्त कृषी दुतांकडून गावामध्ये वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषी दुतांनी गावकऱ्यांना वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून दिले तसेच झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दिला. या कार्यक्रमासाठी अंथरवन पिंपरी



गावचे सरपंच शिवगंगा भाऊराव प्रभाळे उपसरपंच अशोक बन्सीधर शिंदे कृषी सहाय्यक ज्योती शिंदे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंथरवन पिंपरी चे मुख्याध्यापक राजकुमार थोरात , इतर शिक्षक वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

कृषी दूतांच्या या अभ्यास दौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य कल्याण अपेट, प्राचार्य श्याम भुतडा, कार्यक्रम समन्वयक प्रा. वैभव शिंदे, कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय सातपुते व महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

# सौर कृषी पंपाच्या समस्या, मोबाईलवरून तक्रारीची सुविधा

लातूर ।प्रतिनिधी

राज्यात विविध योजनांमध्ये ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले असून सौर पंप बसविल्यानंतर त्यातील बिघाडाबाबतच्या तक्रारी मोबाईल ॲपवरूनही नोंदविण्याची सुविधा महावितरणने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे. महावितरणने लाभार्थी शेतकऱ्यांना सौर कृषी पंप बिघडल्यास तक्रार करण्यासाठी यापूर्वी वेबसाईटवरून तक्रार करणे, संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करणे किंवा महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करून तक्रार करणे असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले होते. आता मोबाईल फोनवरील महावितरणच्या ॲपद्वारे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महावितरणचे मोबाईल ॲप लोकप्रिय ठरले असून वीज ग्राहक त्याचा वापर आपले वीज बिल जाणून घेणे, बिल भरणे यासह मीटर रिडिंग नोंदणी, वीज चोरी कळविणे, नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची माहिती कळविणे अशा विविध कामांसाठी करत आहेत. त्याच प्रमाणे आता शेतकऱ्यांना या मोबाईल ॲपमध्ये 'सौर पंप तक्रार' यावर क्लिक करून सौर कृषी पंपाविषयी तक्रार दाखल करता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहिणे गरजेचे आहे.

सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नसणे, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.

शेतात सौर कृषी पंप बसविल्यानंतर पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसात तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व कंत्राटदारांना त्यांनी ज्या जिल्ह्यात पंप बसविले आहेत त्या जिल्ह्याच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण झाल्यावर त्यांना मोबाईलवर संदेश मिळेल. शेतकऱ्यांच्या तक्रारी व त्यांचे निराकरण याबाबत कंत्राटदार कंपन्यांच्या कामावर महावितरणच्या प्रत्येक मंडलाच्या अधीक्षक अभियंत्यांची देखरेख राहील.

# सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गौतम वाघमारे सेवानिवृत्त

बीड ।प्रतिनिधी

पोलीस खात्यात ३३ वर्षे कर्तव्यनिष्ठ, शिस्तबद्ध व समाजाभिमुख सेवा बजावलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गौतम भानुदास वाघमारे हे दिनांक ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने बीड पोलीस दलामार्फत आयोजित सत्कार समारंभात त्यांचा भव्य गौरव करण्यात आला. सेवाकाळात त्यांनी सिटी पोलीस स्टेशन बीड, ग्रामीण पोलीस स्टेशन बीड, नेकनूर, गेवराई, वडवणी, आणि लिंबागणेश चौकी येथे




जबाबदारीने कर्तव्य बजावले. त्यांच्या प्रामाणिक सेवेसाठी त्यांना एकूण ४३ पदकांनी सन्मानित करण्यात आले, ही बाब त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे.केवळ कायद्याची अंमलबजावणीच नव्हे तर त्यांनी अनेक उध्वस्त संसार पुन्हा थाटले, कौटुंबिक संघर्ष मिटवले,हे कार्य केवळ पोलिसिंगपुरते मर्यादित न राहता मानवी मूल्यांची जपणूक करणारे होते. आणि जनतेच्या मनात माणुसकीचा विश्वास जागवला. म्हणूनच लोक त्यांना प्रेमाने भाऊ म्हणत.तसेच त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचीही प्रेरणादायी बाजू अशी की, त्यांची तीनही मुले यशस्वी झालेली आहेत.एक वकील, एक डॉक्टर आणि एक प्राध्यापक. ही त्यांच्या संस्कारांची आणि शिक्षणातील मूल्यमापनाचीच फलश्रुती आहे. सेवानिवृत्तीनंतर श्री. वाघमारे हे सामाजिक कार्यात सक्रिय राहणार असून, समाजासाठी आपले योगदान देत राहण्याचा

# लोकप्रतिनिधींनी कार्यकर्त्यांना वाटलेल्या कामांच्या रेवड्या पैकी लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या १८५ कामांचा श्रीगणेशा सुद्धा नाही !

## बीड जिल्ह्यात सर्वाधिक १२१४ कामांचा समावेश तर १३३४ कामे कागदावर प्रगतिपथावर – डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विकासासाठी लोकप्रतिनिधी कामे सुचवित असतात.यात २५१५,१२३८ या योजनांमधून मराठवाड्यात गतवर्षी २६२८ कामांना मंजुरी मिळाली त्यातील १३३४ कामे कागदावर प्रगतीपथावर आहेत. मात्र मंजुरीनंतर कामे पूर्ण करण्याकडे लोकप्रतिनिधी आणि कंत्राटदार दोघांनीही डोकावून पाहिले नाही. त्यामुळे वर्षं उलटुनही मंजुर कामांपैकी १८५ कामांसाठी उद्घाटनाचा नारळ फोडलेला नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी कार्यकर्त्यांना वाटलेल्या कामाच्या रेवड्या तशाच असुन मंजूर कामापैकी १८५ कामांचा श्रीगणेशा सुद्धा झालेला नसल्याचे आढळून आले आहे.आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पुन्हा या कामांच्या रेवड्या वाटल्या जाणार का ? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.

बीड जिल्हयात १५१५ आणि १२३८ या हेडखाली मंजूर झालेल्या कामांचा निधी हा वित्त विभागाकडून टप्प्याटप्याने दिला जातो. त्यामुळे वित्तमंत्री व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी यासाठी निधी मंजूर करण्यात यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

ग्रामीण भागातील विकासकामे

गावातील अंतर्गत रस्ते आणि गटारांची दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन करणे, स्मशानभूमी आणि सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था करणे, सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करणे आणि त्यांचे संरक्षण करणे, आरोग्य सुविधांमध्ये सुधारणा करणे,शिक्षण सुविधांमध्ये सुधारणा करणे आदी कामांचा समावेश आहे.

शहरी भागातील विकासकामे...

शहरातील अंतर्गत रस्ते आणि पदपथांची दुरूस्ती, कचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी प्रक्रिया, सार्वजनिक उद्याने आणि क्रिडांगणे विकसित करणे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत



सुधारणा करणे, पर्यटन स्थळांचा विकास करणे, महिला आणि बालविकासाची कामे यांचा समावेश आहे.



बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नामलगाव फाटा येथील लक्ष्मणराव जाहेर पाटील माध्यमिक विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक कालिदास धपाटे यांचा सेवापुर्ती सोहळा मंगळवार दि.१ जुलै २०२५ रोजी मराठवाडा शिक्षक संघ यांच्या वतीने यशवंत विद्यालय कॅनाल रोड बीड येथे मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. यावेळी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब नागरगोजे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक राजकुमार कदम, गणेश वाघ, दत्तात्रय चव्हाण, प्राचार्य डी जी तांदळे, उत्तमराव सानप, नामदेव चव्हाण, बाबा बडे, जे एम पैठणे, गणेश आजबे, युवराज मुरूमकर ,बीड शहर बचाव मंच चे अध्यक्ष नितीन जायभाये , लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे आदींसह बीड शहर बचाव मंच, लक्ष्मणराव जाहेर पाटील माध्यमिक विद्यालय व मराठवाडा शिक्षक संघाचे विविध पदाधिकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आदर्श शिक्षक दिनेश पोकळे व आदर्श शिक्षक किसन निकम यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न

## सेवापूर्ती कार्यक्रम पत्रिकेतून दिला आगळावेगळा संदेश



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील केरुळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेले आदर्श शिक्षक दिनेश पोकळे व धामणगाव येथील राळेसांगवी जिल्हा परिषद शाळेवर मुख्याध्यापक असलेले आदर्श शिक्षक किसन निकम हे दोघेही नियत वयोमानानुसार जून महिन्याच्या ३० तारखेला सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांचा सेवापूर्ती गुणगौरव कार्यक्रम तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये धामणगाव येथील धामणेश्वर मंगल कार्यालयात दि. २८ जून २०२५ रोजी संपन्न झाला.

यावेळी माजी अति. जिल्हाधिकारी शिवाजी शिंदे साहेब, माजी जि. प. सदस्य तथा मा. शिक्षण सभापती उद्धव बापू दरेकर, समाजसेवक विजयकुमार गोल्हार, जामखेड पं. स. चे मा. सभापती संजय वराट, राष्ट्रवादीचे नेते महबूब शेख, राष्ट्रवादीचे युवा बीड जिल्हाध्यक्ष सतीश आबा शिंदे, मा. चेअरमन संजय नाना गाढवे, सरपंच संजनाताई गाढवे तसेच त्यांचे दोघांचेही गुरु खान सर, मराठा सेवा संघाचे जंजिरे बापू, बीड जि. प. चे माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, आष्टीचे माजी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, मा. शि. वि. अ. अर्जुन गुंड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजय अण्णा गाढवे, मा. पं. स. परमेश्वर काका शेळके, संदीप खाकाळ साहेब, दीपक दादा सोनवणे, बाळासाहेब निकम, निवृत्त सुभेदार रावण साळवे, नि. सुभेदार बाळासाहेब गर्जे, मनोज शेठ गाढवे, पप्पू शेठ मरकड, भाऊ शेठ पोकळे, योगेश शेठ पोकळे, अरुण शेठ पोकळे, रवी शेठ निकम, मार्केट कमिटीचे जोशी साहेब, बबलूशेठ तांबोळी, संजय थोरवे, जगन्नाथ ढोबळे, माजी केंद्रप्रमुख पी. वाय, काळे, चंद्रकांत शिंदे, सुरेश मिरगणे, माजी संचालक शांताराम पाथरकर, नवनाथ गाडे, गो. बा. सायकड, प्राचार्य शेख शाकीर, जाकीरशेठ शेख, राम साखरे, विकास साबळे, भरत शेलार तसेच पतसंस्थेचे माजी चेअरमन सुरेश पवार, माजी सचिव सुनील तरटे, तसेच विद्यमान चेअरमन मारुती पठाडे, सचिव महेश शिंदे, आजी - माजी संचालक, दोघांचेही मित्र मंडळीसह शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते तसेच केंद्र खिळाद, जि. प. प्रा. शा. केरूळ येथील सर्व शिक्षक, ग्रामस्थ व केंद्र धामणगाव येथील सर्व शिक्षक, ग्रामस्थ तसेच दोन्ही परिवाराचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक हिरामण पोकळे यांनी केले. तसेच दोघांचा जीवनपट खिळद केंद्राचे मुख्याध्यापक चंद्रकांत लोखंडे यांनी उलगडला. या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे कुणालाही सत्कारामध्ये शाल, फेटा, हार, बुके न देता एक पुस्तक आणि गुलाब पुष्प देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. तसेच सत्कारमूर्तींनी देखील कुणाचेही हार, फेटा, शाल, बुके स्वीकारले नाहीत तर विद्यार्थ्यांसाठी वह्या, पेन, स्वीकारल्या. ते जमा झालेले शैक्षणिक साहित्य ज्या शाळेत गरजू मुले आहेत त्यांना वाटप केले जाणार आहे.

मी अध्यक्ष म्हणून नव्हे तर या दोघांचा बालमित्र म्हणून कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आलो. परंतु त्यांनी मला अध्यक्षाची जबाबदारी दिली. दिनेश आणि किसन या दोघांनीही परिस्थितीवर मात करून शिक्षण घेऊन पुढे ते मुलांना दिलेले आहे. तसेच आज देशामध्ये आणि राज्यांमध्ये मोठमोठ्या पदावर निवड झालेले अधिकारी हे सर्व जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकलेले असून पालकांनी आपली मुले जिल्हा परिषद शाळेत घालावी असे आवाहन सर्व प्रमुख पाहुण्यांनी केले. सत्काराला उत्तर देताना दिनेश अण्णा पोकळे यांनी काही ऋण चांगली असतात, हे ऋण असेच राहू द्या असे म्हणत स्टेजवर सर्वांसमोर नतमस्तक होऊन क्षणभर सर्वांना धक्का दिला. यावेळी अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या आणि लगेच धन्यवाद म्हणून माईक खाली ठेवला. सूत्रसंचालन आदर्श वि. भा. साळुंके व आदर्श शिक्षक संतोष भणगे यांनी केले तर आभार किसन निकम यांनी मानले.



# डॉक्टर्स डे निमित्त २६ जणांचे रक्तदान रोटरी क्लब व आय.एम.ए.चा उपक्रम

अंबाजोगाई -: डॉक्टर्स डे च्या निमित्ताने इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात २६ जणांचे रक्तदान करण्यात आले.येथील इंडियन मेडिकल असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी,वसुंधरा सेवा प्रतिष्ठान,जीवनदाई ब्लड बँक,भुतडा हॉस्पिटल यांच्या वतीने डॉक्टर्स डे चे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा,डॉ.राजेश इंगोले,परमेश्वर गित्ते,आय.एम.ए.चे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे,सचिव डॉ.उद्धव शिंदे,रोटरीच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक,सचिव मंजुषा जोशी,डॉ.अनिल भुतडा, डॉ. मनिषा भुतडा,विनोद पोखरकर,डॉ.सचिन पोतदार,यांच्या उपस्थितीत करण्यात आले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.या माध्यमातून समाजाशी रक्ताने नाते जोडण्याची किमया साध्य होते.असे मुंदडा यावेळी बोलताना म्हणाले. यावेळी डॉ.इंगोले,गित्ते, यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी डॉ.नवनाथ घुगे यांनी या रक्तदान शिबिराच्या आयोजनाची भूमिका सांगून आय.एम.ए. करीत असलेल्या कामांची माहिती दिली. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिरात २६ जणांनी रक्तदान केले.या प्रसंगी डॉ.एन.पी.देशपांडे,डॉ.ज्योती देशपांडे,डॉ.शुभदा लोहिया,डॉ.प्रल्हाद गुरव,डॉ.दीपक लामतुरे,डॉ.अतुल शिंदे,डॉ. अरुणा केंद्रे,डॉ.मनिषा पवार संगीता नावंदर,डॉ.प्रसाद कुलकर्णी,डॉ.विनोद जोशी,रोटरी क्लबचे कल्याण काळे, धनराज सोळंकी, रमेश देशमुख,भीमाशंकर शिंदे,बालाजी घाडगे,जगदीश जाजू,मंदाकिनी गित्ते,यांची उपस्थिती होती.

# मा.आ.भीमराव धोंडे यांनी संत वामनभाऊ आणि संत मदन महाराज पायी दिंडीत चालण्याचा घेतला आनंद



आष्टी (प्रतिनिधी)

अत्यंत पवित्र, उत्साही आणि भक्तीमय वातावरणात संत वामनभाऊंचा पालखी सोहळा पंढरपूरकडे मार्गक्रमण करीत आहे. रोपळे येथे या दिंडीत तर टेंभुर्णी येथे संत मदन महाराज दिंडीत माजी आ. भीमराव धोंडे व काही कार्यकर्ते सहभागी झाले. काही अंतर विठुरायाचा नामघोष करीत चालले.

संत वामनभाऊंच्या लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र पंढरीच्या वाटेवर अत्यंत पवित्र मनाने तल्लीन होऊन मार्गस्थ असतानाच दरवर्षीप्रमाणे यंदाही माजी आ. भीमराव धोंडे यांनी दिंडीत सहभागी होत गळ्यात टाळ घालुन चालले. रविवार दि. ६ जुलै रोजी संत वामनभाऊ यांच्या दिंडीला महापंगत आहे. अध्यात्म परंपरेमध्ये माजी आ. धोंडे घराण्याची वारीची सेवा करण्याची परंपरा माजी आ. भीमराव धोंडे यांनी सातत्याने जपली आहे. महाराष्ट्राच्या संत परंपरेने पावन अशा भूमित पंढरीच्या वारकऱ्यांना स्नेहभोजन देतात. अत्यंत पवित्र मनाने गेल्या १५ वर्षापासून माजी आ. भीमराव धोंडे यांनी ही परंपरा जपली आहे. महाराष्ट्रातील संतांनी सांगितलेला समता, बंधुत्व, ऐक्याचा संदेश यापुढेही आपण जतन करूयात, संतांचा समतेचा संदेश पुढे नेऊया. असे सांगत अत्यंत पवित्र, उत्साही आणि भक्तीमय वातावरणात संत वामनभाऊंचा पालखी सोहळा अशी पावित्र्यपूर्ण भावनिक साद माजी आ. भीमराव धोंडे यांनी दिली. श्रीक्षेत्र गहिनीनाथगडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज गहिनीनाथकर यांच्या नेतृत्वाखाली गहिनीनाथगड ते पंढरपूर असा पायी दिंडी पालखी सोहळा सुरु आहे. वारकऱ्याशी संवाद साधताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी यावर्षी वरुणराजाची वेळेवर कृपा झाली, शेतकऱ्यांनी आपले शेतीचे कामे पेरणी उरकुन मोठ्या संख्येने दिंडीत सहभागी झाले. त्यामुळे किमान ५ लाख वारकरी वाढणार आहेत. बळीराजा खुष आहे असेही माध्यमांशी बोलताना सांगितले.

# युवा पत्रकार संघाच्या वतीने अमरापूर ते पंढरपूर दिंडीतील वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने अमरापूर ते पंढरपूर दिंडीतील वारकऱ्यांना रविवार दि. २९ जून रोजी दुपारी ४ वाजता आष्टी येथील डोईठाण रोडवरील शिदेवाडी फाटा येथे प्रवास करणाऱ्या वारकऱ्यांसाठी चहा - बिस्किटांचे अल्पोपहार वाटप केले. ही मोहीम संघाच्या सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून आयोजित करण्यात आली होती. यावेळी भैरवनाथ पायीं दिंडी अमरापूर ते पंढरपूर दिंडीतील ह. भ. प. काका महाराज मुखेकर, ह. भ. प. उद्धव महाराज जाधव यांचे आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पत्रकार समीर शेख, मारूती संत्रे, डिमोलेशन कॉन्ट्रॅक्टर अक्षय भोसले, गुलाब काकडे, राजेंद्र पोकळे, गणेश पोकळे, काकासाहेब पोकळे, सागर नन्नवरे, मिरा थोरात, अमृपाली चव्हाण यांनी स्वागत केले. याप्रसंगी अमरापूर येथील ह. भ. प. काका महाराज मुखेकर व वारकऱ्यांनी युवा पत्रकार संघाच्या या स्तूत्य उपक्रमाचे कौतुक केले. सेवा हाच परमेश्वराचा मार्ग या भावनेतून आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने सामाजिक सेवेच्या अनेक कार्यक्रमांचा भाग म्हणून वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप करण्यात आले तर हा उपक्रम पुढील वर्षीही अशाच प्रकारच्या सेवाभावी कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे संघाचे मनोधारणा असल्याचे अध्यक्ष अविनाश कदम यांनी सांगितले.

# एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्या ; पोस्ट ऑफिस मध्ये कर्मचारी व काऊंटर वाढवा

## समाजवादी पार्टीचे पोलिस निरीक्षक व पोस्ट मास्टर यांना निवेदन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई शहरात एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्या, तसेच पोस्ट ऑफिस मध्ये नागरिकांची वाढती गर्दी पहाता कर्मचारी व काऊंटर यांची संख्या वाढवावी अशी मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ऍ़ड.शिवाजी कांबळे, शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी अंबाजोगाई शहर ठाण्याचे पोलिस निरीक्षक व पोस्ट मास्टर यांना मंगळवार, दिनांक १ जुलै रोजी दिलेल्या दोन स्वतंत्र निवेदनातून केली आहे.

याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले की, पोलिस निरीक्षक यांना दिलेल्या पहिल्या निवेदनात नमूद केले आहे की, समाजवादी पार्टी, अंबाजोगाई (जि.बीड) यांच्या वतीने उपजिल्हाधिकारी तसेच एस.टी.आगारप्रमुख यांना यापूर्वी दि.३० एप्रिल २०२५ रोजी निवेदन देण्यात आलेले आहे. तरी एस.टी डेपो मॅनेजरने सांगितले की, याबाबत आपण पोलीस स्टेशनला ही कळवा. म्हणून आज रोजी आम्ही आपणांस निवेदन देत आहोत. विषय असा की, पोलिस प्रशासनाने अंबाजोगाई शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोर जागा उपलब्ध करून दिल्यास आम्ही एस.टी तिथे थांबवू, पुर्वी एस.टी बसेस या छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील जिल्हा परिषद शाळेसमोर थांबत होत्या. तेथेच प्रवासी बसेस मधून उतरत असत. सध्याच्या थांबामुळे रहदारी व वाहतूकीस मोठा अडथळा निर्माण होतो आहे. कारण, मोंढा रोडपासून ट्राफिक जाम होतो. मोंढा येथे दर मंगळवारी बाजार भरतो. तसेच या परिसरातच न्यायालयाकडे व स्वाराती रूग्णालयाकडे जाणारा रस्ता आहे. आणि आद्यकवी मुकुंदराज समाधी परिसराकडे जाणारा रस्ता व श्री योगेश्वरी देवी मंदीराला जाणारा रस्ता ही आहे. मोंढ्याकडून आणि स्वातंत्र्यवीर सावरकर चौकाकडून दोन्ही साईडची ट्राफीक छत्रपती शिवाजी महाराज चौक नजीक मध्यभागी एसटी बसेस थांबत असल्यामुळे जाम होते. त्यामुळे एस.टी बसला छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुर्वीच्याच ठिकाणी थांबा द्यावा तसेच अंबाजोगाई येथील पोस्ट कार्यालयात फार पुर्वीपासून जेवढे कांऊटर आहेत. आज सुध्दा तेवढेच कांऊटर व कर्मचारी आहेत. वाढते शहरीकरण आणि नागरिकीकरण पहाता तसेच दिवसेंदिवस पोस्टाच्या विविध सुविधांचा लाभ घेणाऱ्या नागरिकांची संख्या ही वाढत आहे. मुलभूत सुविधा तात्काळ मिळत नाहीत. यासाठी ग्राहक तसेच जेष्ठ नागरिक यांना पोस्ट ऑफिस मध्ये गर्दीमुळे ताटकळत थांबावे लागते. बँक व्यवहारासाठी तसेच रजिस्टर पोस्ट आणि विविध कामांसाठी कांऊटर कमी असल्यामुळे खूप वेळ वाया जातो. तरी पोस्टमास्टर यांनी वरीष्ठांना याबाबत त्वरित कळवावे आणि अंबाजोगाई पोस्ट ऑफिस कार्यालयात कांऊटरची संख्या व कर्मचारी वाढविण्यात यावेत. तसे न झाल्यास अंबाजोगाई पोस्ट ऑफिससमोर अंदोलन करण्यात येईल याची संपुर्ण जबाबादारी पोस्ट मास्टर यांच्यावर राहील. असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ऍ़ड.शिवाजी कांबळे, अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी, शहर उपाध्यक्ष शेख शाकेर यांच्या स्वाक्षर्या आहेत.

# आदर्श शिक्षक संदिप धोंडे सरांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

## वाढदिवसानिमित्त सर्वांना शुभेच्छा देणारे संदिप सर



आष्टी (प्रतिनिधी)

जुनी पेन्शन संघटनेचे आष्टी तालुक्याचे माजी अध्यक्ष तथा आदर्श शिक्षक संदिप धोंडे सर सर्वांच्या सुखदुःखात कायम हजर असणारे व प्रत्येकाच्या मदतीला धावून येणारे, सर्वांना वाढदिवसानिमित्त आवर्जून शुभेच्छा देणारे, विद्यार्थी प्रिय आदर्श शिक्षक, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा धामणगाव, ता. आष्टी, जि. बीड येथील विषय शिक्षक यांचा वाढदिवस तालुक्यातील सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत पुस्तके व पुष्पगुच्छ देऊन साजरा करण्यात आला.

आदर्श शिक्षक संदिप धोंडे सरांनी वाढदिवसानिमित्त आपला वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा केला. पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा त्यांनी वाढदिवसानिमित्ताने निश्चय केला आहे. वाढदिवसानिमित्ताने त्यांचा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड, मुख्याध्यापक सुरेश पवार, महेशकुमार शिंदे व आष्टी तालुक्यातील जुनी पेन्शन संघटनेचे तालुकाध्यक्ष मुकेश शिंदे, दिपक सोले, पांडुरंग लटपटे, गणेश ननवरे, अनिल शेळके, शिवराज लगड, तात्या गवळी, शुभम जगताप, अक्षय वाघुले, भाऊसाहेब झगडे, संतोष शेळके, अनिल बेदरे, आप्पासाहेब काळे, संदिप कुलकर्णी, दादासाहेब चव्हाण, अण्णासाहेब घोडके, राजेंद्र शेळके, अमोल कदम, अनिल हजारे, सचिन कदम, संजय चौधरी, खुळपे सर, श्रीकांत कारंडे, लक्ष्मण दिवटे, अशोक पठाडे, अशोक विधाते, संदिप मस्के, राजेंद्र हजारे, शीघ्र कवी अजय भराटे, महादेव गीते, नवनाथ जिरेकर, विकास धस, राजेंद्र खेडकर, यशवंत राऊत, रणजीत वारे, मच्छिंद्र सापे, महेश तवले, गणेश गिरी, सतिश जाधव, शिवाजी कर्डिले, वीरू जानापुरे, सतीश जाधव, अशोक पोकळे, शिवदास शिंदे, संतोष पोकळे, संजय सोले, अनिल धस, झगडे सर, अनारसे सर, कोथिंबिरे सर, गोरक्ष गोरे, वैजनाथ रायते, रविंद्र हुमे, बनकर सर, विशाल चव्हाण, जगताप सर, शशिकांत खाडे व तालुक्यातील शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी

# मोठमोठे अधिकारी करण्याचे काम जिल्हा परिषद शाळेने केले - दरेकर, धस सेवापुर्ती सोहळ्यात सुर्यभान पठाडे यांचे मान्यवरांकडून कौतुक

आष्टी (प्रतिनिधी)

दुसर्याच्या कल्याणासाठी जो जगतो त्याला जिवन असे म्हटले जाते त्याप्रमाणे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक हा पोटतिडकीने आपल्या जिवाची बाजी लावून आपल्या विद्यार्थ्यांसाठी अध्ययनाचे काम करत असतो. त्याला इतर शाळेप्रमाणे फिस ची किंवा कसल्याही प्रकारची अपेक्षा नसल्याने त्यांना फक्त आणि फक्त आपला विद्यार्थी कसा सुसंस्कारित होईल या उद्धात्त हेतूने त्यांची शिकवण चालु असल्यामुळे आज आपल्याला मोठमोठे अधिकारी हे जिल्हा परिषद आणि मराठी शाळेत शिकलेले पहावयास मिळत असल्याचे मत माजी आमदार साहेबराव दरेकर व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य देवीदास आबा धस यांनी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुर्यभान पठाडे सर यांच्या सेवापुर्ती सोहळ्यात व्यक्त केले.

चिंचपूर येथील युग लॉन्स येथे आष्टी तालुक्यातील मातकुळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुर्यभान आबा पठाडे यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा रविवारी दि. २९ जून २०२५ रोजी सपत्नीक सत्कार करून मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार साहेबराव दरेकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे माजी सदस्य देवीदास आबा धस, माजी सभापती बद्रिनाथ जगताप, जिल्हा परिषद सदस्य अमरराजे निंबाळकर, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, गटशिक्षणाधिकारी सीमा काळे, माजी गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे चेअरमन मारुती पठाडे, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे उपाध्यक्ष अशोक लटपटे, स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे सचिव महेश शिंदे, केंद्र प्रमुख धर्मराज शिंदे, मातकुळी गावचे सरपंच बबन दादा डोके,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कांतीलाल जरे, जिल्हा परिषद बीड द्रोपद यादव, झांबरे मुकादम, युवा उद्योजक तात्यासाहेब जरे, रावसाहेब पाटील, चेअरमन भरत डोके, बंकट पाचबैल, समीर खेमगर, ग्रामसेवक बारीकराव पठाडे, डॉ. युवराज खराडे, विकास जरे, अनिल जाधवर, नामदेव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना माजी आमदार दरेकर म्हणाले की, शिक्षणासाठी अनेक थोर महापुरुषांनी काम केले असून गोरगरीब, कष्टकरी यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सरकारी शाळा स्थापन केल्या असून याच शाळेतून मोठमोठे अधिकारी निर्माण झाले आहेत तेंव्हा शिक्षणाच्या बाजारीकरणापासुन दुर प्रत्येक पालकांनी मराठी शाळा निवडून आपल्या पाल्यांना मराठी शाळेतच प्रवेश द्यावा तसेच जिल्हा परिषद माजी सदस्य देविदास आबा धस म्हणाले की, शिक्षण क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाली असून आज इंग्लिशस्कुलच फॅड झालं असुन पालकवर्ग आपल्या तीन वर्षांच्या मुलाला इंग्रजी शाळेत पाठवत असल्याने खेळण्याबागडण्याच्या वयात त्याच्यावर अभ्यासाचा ताण येत असून ते मुले कोमेजून जात आहेत. तेंव्हा आपल्या मुलांना सहा वर्षांनंतरच शाळेत पाठवण्याचे आवाहन केले तसेच पहिली ते सातवी पर्यंत मराठी शाळेतच पाठवा आणि नंतर पुढील शिक्षणासाठी तुम्ही दुसरा पर्याय निवडावा असे मत व्यक्त केले. तर यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुर्यभान पठाडे सर म्हणाले की, आज माझा सेवापुर्ती सोहळा होत असून मी नाराज नसून मी आनंदी आहे कारण ३८ वर्षे सेवा करण्याचे मला भाग्य लाभले असून आता पर्यंत आपल्या सेवेच्या काळात अनेक चांगले सहकार्य लाभले आणि आपल्यापरीने आपण शिक्षण क्षेत्रात अध्ययन करताना कसलीही तक्रार आली नाही. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर गळगटे यांनी केले तर आभार विनायक पठाडे यांनी मानले.



## थोडक्यात महत्त्वाचे....

### विधानपरिषद मधून लक्षवेधी.... शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्याची राज्य सरकारची तयारी – उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई – शेतकरी हा लाखोंचा पोशिंदा आहे आणि राज्यातले सरकार शेतकऱ्यांचेच सरकार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडविणे, शेतकऱ्यांना मदत करणे सरकारची जबाबदारी असून आमचे सरकार ती पार पाडेलच. शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शासनाची भूमिका स्पष्ट करताना सांगितले.उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभेत म्हणाले की, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे. सरकार चर्चेपासून पळ काढणार नाही, हे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेतच मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

### बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'एल' विभागात १०८ अनधिकृत हॉटेल आणि ८१ लॉजिंग–बोर्डिंगवर कारवाई – नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ

मुंबई – बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एल विभागातील कुर्ला (पश्चिम) एल.बी.एस. रोड व साकीनाका या परिसरात १ जुलै ते ३० जून या कालावधीत १०८ अनधिकृत हॉटेल्स आणि ८१ लॉजिंग बोर्डिंगवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधान परिषदेत दिली.विधान परिषद सदस्य राजहंस सिंह यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. या सूचनेच्या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, भाई जगताप, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी चर्चेत सहभाग घेतला.

### कृष्णराव भेगडे यांना विधानपरिषदेत श्रद्धांजली

मुंबई – माजी विधानपरिषद सदस्य कृष्णराव धोंडीबा भेगडे यांच्या निधनाबद्दल विधानपरिषदेत शोक प्रस्ताव मांडून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सभापती प्रा. राम शिंदे यांनी कृष्णराव धोंडीबा भेगडे यांच्या निधनाबद्दल सभागृहाच्यावतीने दुःख व्यक्त केले.

### राज्यातील शाळांमध्ये कमी पटसंख्या असूनही शाळा बंद नाही– उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई – राज्यातील काही भागांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या घटल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरत असून, त्या शिक्षकांचे योग्य समायोजन करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिली. विद्यार्थी संख्या कमी झाली तरी कुठलीही शाळा बंद केली जाणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. तसेच शासनाने कोणतीही शाळा बंद केली नसल्याची माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली. विधानपरिषद सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे आणि राज्यमंत्री श्री. भोयर बोलत होते. यावेळी सदस्य जयंत आसगावकर, ज. मो. अभ्यंकर, अमोल मिटकरी, अभिजित वंजारी, ज्ञानेश्वर म्हात्रे, एकनाथ खडसे, शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला.

### पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात कोणावरही अन्याय होणार नाही – राज्यमंत्री माधुरी मिसाळ

मुंबई – पिंपरी–चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्यावरील (उ्झ – ऊर्शींशश्रेशिपीं झश्ररप) प्रक्रिया सध्या हरकती आणि सूचनांच्या टप्प्यावर आहे. या विकास आराखड्यामध्ये कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल, असे राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधान परिषदेत सांगितले.

विधानपरिषद सदस्य अमित गोरखे यांनी उपस्थित केलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विकास आराखड्याविषयीच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ बोलत होत्या. यावेळी सदस्य सतेज पाटील, श्रीकांत भारतीय, सचिन अहिरे, श्रीमती उमा खापरे, शशिकांत शिंदे, सत्यजीत मोहिते पाटील यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

### राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई – राज्यातील विनाअनुदानित शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान देण्याच्या निर्णयावर शासन ठाम असून, संबंधित शाळांनी विहित नियमांची पूर्तता केली असल्यास त्यांना लवकरच पुढील टप्प्याचे अनुदान देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत दिली.विधानपरिषद सदस्य किरण सरनाईक यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्यात पूर्वी अनेक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती. मात्र, २००९ नंतर 'कायम' शब्द काढून टाकत टप्प्याटप्प्याने या शाळांना अनुदान देण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. २०१६, २०१८ आणि नंतर २०२३ पर्यंत अनेक शाळांना अनुदान दिले गेले असून, आता पुढील टप्प्यातील शाळांसाठी १० ऑक्टोबर २०२४ रोजी बैठक घेण्यात आली आणि १४ ऑक्टोबर २०२४ रोजी याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.



बीड जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग नुतन शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांचे कार्यालयत यथोचित स्वागत मुप्टा शिक्षक संघटनेच्यावतीने करण्यात आले. बीड जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, जिल्हासचिव प्रा. शशिकांत जावळे,जिल्हाध्यक्ष (ज्यू)प्रा.नारायण घोलप, जिल्हाध्यक्ष प्रविण तरकसे, तालुकाध्यक्ष प्रा.शेख मसरूर अन्वर आदी उपस्थित होते.

## मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालय पेठ बीड येथे वसंतराव नाईक यांची जयंती व कृषी दिन साजरा

बीड ।प्रतिनिधी

येथील राजस्थानी सेवा समाज संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालय बीड येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती व कृषी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सोहनी सर प्रमुख पाहुणे म्हणून श्री गांधी सर होते.यावेळी श्री कुलकर्णी सर तसेच श्री गांधी सर यांनी शेती व आजचे जीवन यावर विस्तृत अशी माहिती सांगितली.शाळेचे मुख्याध्यापक श्री सोहनी सर यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री बोरा सर यांनी तर आभार प्रदर्शन सौ. चांडक मॅडम यांनी मानले.




# मुलींनो निडर व्हा : सपोनी ढाकणे

## मुलींच्या सुरक्षेबाबत दिंद्रुड पोलिसांचे विद्यार्थिनींना धडे



दिंद्रुड ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील इंदिरा गांधी कन्या शाळेतील विद्यार्थिनींना निडर होत चुकीच्या गोष्टींना बळी पडू नका, आपल्या बाबत काही चुकीच्या घटना घडत असतील तर प्रकाशात आणा, आपल्या सुरक्षेसाठी पोलीस सदैव सतर्क असल्याबाबत दिंद्रुड पोलीस स्टेशनचे सपोनि महादेव ढाकणे यांनी बुधवारी मार्गदर्शन केले. समिधा संस्थेच्या वतीने पुस्तक भेटीच्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

बीड जिल्ह्यातील बीड येथील कोचिंग क्लासेस मध्ये विद्यार्थिनींवर झालेल्या अघटीत घटनेने मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यासाठी दिंद्रुड पोलीस स्टेशनच्या वतीने दामिनी पथक, पोलीस काका व पोलीस दिदी यांची कामे त्याचप्रमाणे मुलींच्या सुरक्षेविषयी विशेष धडे सपोनी महादेव ढाकणे यांनी विद्यार्थिनींना दिले. मुलींच्या बाबत काही अघटित घटना घडत असतील तर शंका मनात न ठेवता थेट पालक, आपल्या शाळेतील वर्ग शिक्षक, शिक्षिका व पोलिसांना याबाबत कळवत काही अघटीत होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत ढाकणे यांनी मुलींना मार्गदर्शन केले. मोबाईलच्या आहारी न जाता पुस्तक वाचनावर भर द्यावा, आपल्या आई–वडिलांची मान शरमेने खाली जाणार नाही यासाठी काळजी घ्यावी याबाबत ढाकणे यांनी उपदेश दिला. बुधवारी समिधा फाउंडेशन व सरहद फाउंडेशन च्या वतीने शेकडो पुस्तकांचे वाटप इंदिरा गांधी कन्या शाळेत संस्थेचे समन्वयक देवराज युवराज ठोंबरे यांच्या वतीने करण्यात आले. याप्रसंगी सपोनी महादेव ढाकणे, पोलीस शिपाई अंजना मेंडके, ज्ञानेश्वर म्हेत्रे माजी उपसरपंच युवराज ठोंबरे, बळीराम डापकर, नारायण चांदबोधले, ग्रां.पं. सदस्य महेश ठोंबरे, पत्रकार संतोष स्वामी, गणेश काटकर, मुख्याध्यापक अशोक बोचरे, रामराव लांडगे, ग्रंथालय विभाग प्रमुख डाके यांची उपस्थिती होती.

## विजयसिंह दिख्खत यांच्या वाढदिवसा निमित्त शुभेच्छाचा वर्षाव



धारूर /प्रतिनिधी

धारूर शहरात व बीड जिल्ह्यात ठाकुर या नावाने परिचित असलेले व जिल्हाभर अनेक तरूणांना उद्योग क्षेत्रात मार्गदर्शन करून व अनेकांना रोजगार निर्मीती करून देणारे स्व.गोपीनाथ मुंडे यांचे जिवाळ्याचे समंध असणारे मंत्री पंकजा मुंडे यांचे विश्वासु ठाकुर उदयसिंहजी दिख्खत यांचे सुपुत्र त्याच्याच पावलावर पाऊल टाकत उद्योग क्षेत्रात उंच भरारी घेत असुन त्यासोबत सामाजिक कार्यांची जोड अंबाचोंडी देवी मंदिरासाठी तिर्थ क्षेत्र बनवण्यासाठी सतत प्रयत्नशिल ठाकुर विजयसिंह दिख्खत यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी अनेक ठिकाणी साजरा करण्यात आला.

अनेक बेरोजगार तरूणांच्या हाताला काम मिळवून देणारे विजयसिंह दिख्खत यांच्या वाढदिवसानिमित्त त्या तरूणांन कडून शुभेच्छा देण्यात आल्या. त्याच प्रमाणे धारूर शहरात विविध ठिकाणी त्यांच्या वाढदिवसा निमित्त शुभेच्छाचा वर्षाव झाला. बीड जिल्ह्यातुन विविध भागातील अनेक नागरिकांनी धारूर येथे येत ठाकुर विजयसिंह दिख्खत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



अंबड ।प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे महाकाळा ग्रामपंचायत येथे हरित क्रांतीचे जनक, प्रणेते माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांची जयंती व महाराष्ट्र कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली यावेळी सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हरितक्रांतीचे जनक प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच कृषि विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना, –सीळींींरलज्ञ शेतकरी नोंदणी, पी एम किसान शझूल, आधार सिडींग, म.ग्रा.रो हमी योजना,फळबाग लागवड, आदी योजनेविषयी सहाय्यक कृषि अधिकारी विजय जाधव यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी जयमंगल कव्हळे, सरपंचअशोक चिमणे, नारायण क्षीरसागर, गणेश कव्हळे, भागवत वाघमारे,शरद पटेकर,ग्राम विकास अधिकारी सूरेश धोत्रे, सहाय्यक कृषि अधिकारी विजय जाधव व गोवर्धन उंडे.. ग्रामपंचायत कर्मचारी राजु पटेकर,भीमराव पाळीक ,तसेच इतरही शेतकरी बांधव व गावकरी मोठ्या संख्येने उपस्तित होते.

## आ.नारायण कुचे यांनी विधिमंडळ अधिवेशनात प्रश्न मांडला तत्काळ शोध यंत्रणेत वाढ करून

# नवयुवक वारकरी आकाश उर्फ गोविंद फुके यांच्या मृददेहाचा शोध लागला

अंबड ।प्रतिनिधी

बदनापूर– अंबड विधानसभा मतदारसंघातील अंबड तालुक्यातील मौजे झिरपी येथील आई–वडिलांना एकुलता एक असलेला १७ वर्षीय वारकरी नवयुवक आकाश उर्फ गोविंद कल्याण फुके याचे आळंदी ते पंढरपूर पायी चालत असताना मंगळवार दिनांक एक जुलै २०२५ रोजी नीरा नदी काठावर पाय धुत असताना नवयुवक वारकरी पाय घसरून सकाळी सहा वाजता नदीमध्ये पडला, या वारकऱ्याचा अजून कुठलाही शोध लागला नाही यासाठी आमदार नारायण कुचे यांनी पुणे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्याशी फोन




करून संवाद साधला परंतु अद्यापही या वारकऱ्यांचा शोध लागला नसल्याने आमदार नारायण कुचे यांनी विधिमंडळ अधिवेशनात विधिमंडळ मार्फत सरकारला प्रश्न करून तात्काळ या वारकरी नवयुवकाच्या मृतदेहाचा शोध घ्यावा असा प्रश्न आमदार नारायण कुचे यांनी विधिमंडळ अधिवेशनात मांडला आणि तात्काळ शोध यंत्रणेत वाढ करून नवयुवक वारकरी आकाश उर्फ गोविंद कल्याण फुके यांच्या मृतदेहाचा शोध घेण्यात आला, याच बरोबर नवयुग वारकऱ्यांच्या कुटुंबाला मुख्यमंत्री सहायता निधीतून तात्काळ आर्थिक मदत करण्यात यावी असा प्रश्न यावेळी विधिमंडळ अधिवेशनात आमदार श्री नारायण कुचे यांनी उपस्थित केला.



## म.न.पा.मुर्गी तलाव शाळेत वसंतराव नाईक जयंती उत्साहात साजरी

जालना ।प्रतिनिधी

शहरातील मुर्गी तलाव परिसरातील महानगरपालिकेच्या शाळेत हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती 'महाराष्ट्र कृषी दिन' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती अख्तर जहाँ कुरैशी यांनी वसंतराव नाईक यांच्या महान कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन शिरीन समिना तर आभार प्रदर्शन रेखा गायकवाड यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मिलिंद तायडे (जिल्हा संघटक स्काऊट), सोनिया शिरसाठ(जिल्हा संघटक गाईड) विद्या जगनाडे, अ.वहीद जावेद, ज्योती वाघ, रईसा बी,स्काऊटस्,गाईडस् व विद्यार्थी उपस्थित होते.

# अवैधरित्या वाळू उत्खनन व वाहतूक दारांना अंबड तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांचा कडक इशारा

अंबड ।प्रतिनिधी

घनसांवगी तालुक्यातील अवैध वाळू उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांनी कारवाईचा बडगा उगारला असून अवैध वाळू उत्खनन किंवा वाळू वाहतुकीची माहिती मिळताच आपल्या पथकासह मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी जाऊन दंडात्मक कारवाई करण्याचे काम हाती घेतल्याने तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांच्या धडाकेबाज कारवाई मुळे वाळू माफियात धास्ती निर्माण झाली आहे शासनाच्या आदेशानुसार तालुक्यात कुठल्याही भागात गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतूकीला मुळीच थारा दिला जाणार नाही असा इशारा अंबड तहसीलदार तथा उपविभागीय अधिकारी विजय चव्हाण यांनी दिला आहे.

